महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id : pmcmco@gmail.com
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/६२०
दिनांक : ०६ /०५ /२०२०

**आदेश,**

**विषय :** बिगर अत्यावश्यक सेवेची दुकाने पुणे महानगरपालिका क्षेत्रात उघडताना घ्यावयाची दक्षता.

**संदर्भ :**
१) कोविड – १९ , प्रतिबंधात्मक उपाययोजना करिता सुधारीत एकत्रित मार्गदर्शकसूचना आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक १७/०४/२०२०, दि.२१/०४/२०२०, आणि दि.२३/०४/२०२०.
२) अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुबई, क्र. करोना२०२०/ प्र.क्र ५८/आरोग्य५, दि. १४ मार्च २०२०.
३) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
४) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
५) कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना करिता सुधारीत एकत्रित मार्गदर्शक सूचना आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक०२/०५/२०२० व दि. ०३/०५/२०२०
६) पुणे महानगरपालिका यांचे आदेश क्र. मआ/साप्रवि/४९९ दि. ०३.०५.२०००
७) मा.विभागीय आयुक्त ,पुणे यांचे जा.क्र.-मह /नेआ /३/कावि/२५३/२०२० दि.०४.०५.२०२०
८) शासनाचे स्पष्टीकरण आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM- १, दि.०५.०५.२०२०

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाचे आदेश दिनांक १७/४/२०२० मधील नमूद केलेले नुसार राज्यातील कोविड-१९ हॉटस्पॉट निर्माण झालेल्या शहरात (Containment Zone) क्षेत्र निश्चित करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका यांना दिलेले आहेत.

तसेच भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ प्रमाणे संभाव्य होणाऱ्या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मानवी आरोग्याला व जीवीताला निर्माण होणारा धोका टाळण्याकरिता या कार्यालयाने उपरोक्त संदर्भांकित क्र ७ अन्वये आदेश निर्गमित केले असुन त्यानुसार पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंधित क्षेत्र ( Containment Zone) घोषित केले आहेत. सदर आदेशातील अनुसूची मधील नमूद केल्याप्रमाणे संक्रमणशील क्षेत्राच्या बाहेरील क्षेत्रामध्ये विविध बाबींसाठी खालीलप्रमाणे परवानगी देण्यात येत आहे.

**अ) संक्रमणशील ( Containment Zone) क्षेत्र**

१) **सकाळी १० ते दुपारी २** या कालावधीत दुध , भाजीपाला, फळे, मटन, चिकन व अंडी यांची किरकोळ विक्री सुरू राहील.

२) सर्व प्रकारचे दवाखाने , इस्पितळे , प्रसुतीगृहे व औषधी दुकाने सुरू राहतील.

**ब) संक्रमणशील क्षेत्र ( Containment Zone)वगळून**

१) अत्यावश्यक दुकाने व सेवा - दुध, भाजीपाला , फळे , किराणा दुकाने, मटन, चिकन व अंडी विक्री, सर्व प्रकारचे दवाखाने, इस्पितळे , क्लिनिक, प्रसुतीगृहे व औषधी दुकाने सकाळी ७ ते सायंकाळी ७ सुरू राहतील.

२) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रकारचे मॉल,व्यापारी संकुले हे उक्त लॉकडाऊन कालावधीत बंद राहतील. तसेच लक्ष्मी रोड, बाजीराव रोड, शिवाजी रोड, टिळक रोड, अप्पा बळवंत चौक परिसर, कुमठेकर रोड, एम.जी.रोड, कोंढवा रोड, ज्योती हॉटेल ते एनआयबीएम रोड या रस्त्यावरील अत्यावश्यक नसलेली कोणतीही दुकाने व सेवा सुरु करण्यास मनाई आहे.

३) नागरी वसाहतीमधील व संकुलामधील अत्यावश्यक वस्तु व्यतिरिक्त एकल (Standalone) दुकाने सुरू राहतील.

४) एक रस्ता किंवा गल्लीमध्ये अशा प्रकारच्या जास्तीत जास्त पाच दुकानांनाच प्रती १ किलोमीटर प्रमाणे मुभा असेल. मात्र अशा दुकानांची संख्या जास्त असण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे व पुणे शहर अद्यापी रेड झोनमध्येच असल्यामुळे पहिल्या टप्प्यामध्ये केवळ खालील प्रकारच्या व्यवसायांना परवानगी देण्यात येत आहे. सदरची दुकाने **सकाळी ७ ते सायंकाळी ७ या वेळेत सुरु राहतील.**

| अ.क्र. | वस्तू विक्रीसाठी निश्चित केलेले दिवस | व्यवसायाचा प्रकार |
|---|---|---|
| १ | सोमवार | इलेक्ट्रॉनिक साधने, संगणकीय अनुषंगिक साहित्य साधने सामुग्री व मोबाईल विक्री वदुरूस्तीइंलेक्ट्रीक वस्तु विक्री व दुरूस्ती,भांड्याची विक्री दुकाने |
| २ | मंगळवार | वाहनांचे दुरूस्ती गॅरेज , हार्डवेअर, प्लंबिग,बांधकाम साहित्य साधन सामुग्री, कपडयांची दुकाने, डेअरी उत्पादने |
| ३ | बुधवार | इलेक्ट्रॉनिक साधने, संगणकीय अनुषंगिक साहित्य साधने सामुग्री व मोबाईल विक्री वदुरूस्तीइंलेक्ट्रीक वस्तु विक्री व दुरूस्ती,भांड्याची विक्री दुकाने |
| ४ | गुरुवार | वाहनांचे दुरूस्ती गॅरेज , हार्डवेअर, प्लंबिग,बांधकाम साहित्य साधन सामुग्री, कपडयांची दुकाने, डेअरी उत्पादने |
| ५ | शुक्रवार | इलेक्ट्रॉनिक साधने, संगणकीय अनुषंगिक साहित्य साधने सामुग्री व मोबाईल विक्री वदुरूस्तीइंलेक्ट्रीक वस्तु विक्री व दुरूस्ती,भांड्याची विक्री दुकाने |
| ६ | शनिवार | वाहनांचे दुरूस्ती गॅरेज , हार्डवेअर, प्लंबिग,बांधकाम साहित्य साधन सामुग्री, कपडयांची दुकाने, डेअरी उत्पादने |
| ७ | रविवार | वाहनांचे दुरूस्ती गॅरेज , हार्डवेअर, प्लंबिग,बांधकाम साहित्य साधन सामुग्री, कपडयांची दुकाने, डेअरी उत्पादने |

५) जीवनावश्यक वस्तुंचे व औषधांचे आणि तयार अन्न पदार्थाचे घरपोच वाटप सकाळी १० ते रात्री १० पर्यंत राहील.

**अत्यावश्यक असलेल्या व अत्यावश्यक नसलेल्या ठिकाणांबाबत खालीलप्रमाणे सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.**

१) प्रत्येक दुकाना मध्ये "सामाजिक अंतर" (Social Distancing) राखणेची जबाबदारी संबंधित दुकानदाराची राहील.

२) दुकानदारांनी कामगारांना फोटोसह ओळखपत्र देणेत यावे.

सर्व संबंधितांनी आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांका पासुन तात्काळ करण्यात यावी. तसेच आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यकतीने अथवा संस्थेने भारतीय दंड सहीता १८६० (४५) चे कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल व संबंधिता विरूध्द पुढील कारवाई करण्यात येईल.

(शेखर गायकवाड)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका, पुणे

प्रति,

१) महापालिका सहाय्यक आयुक्त (सर्व)
क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका
याजकडे कार्यवाहीसाठी --------

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.
३) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.
यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित